| | |
|---|---|
| | **महाराष्ट्र शासन आरोग्य सेवा**<br>**ग्रामीण रुग्णालय मालवण, जिल्हा – सिंधुदुर्ग** |

| | | |
|---|---|---|
| दूरध्वनी क्रमांक<br>आहरण व संवितरण क्रमांक | (०२३६५) २५२०३२<br>१५०४०१२५३७ | फोवकांड पिंपळ जवळ, मालवण.<br>जिल्हा – सिंधुदुर्ग (४१६६०६)<br>ई-मेल : |


**आरोग्य सेवा**

जा.क्रं.ग्रारुमा/लेखा/आहारसेवा/५०-५१ /२०२६
दिनांक :-०८/०१/२०२६.

## दरपत्रक मागविणारी जाहिर सुचना

वैद्यकिय अधिक्षक, ग्रामीण रुग्णालय मालवण, ता. मालवण, जि. सिंधुदूर्ग हे खालील नमुद केलेल्या कामासाठी सिलबंद लखोटयातून विहित केलेल्या अटी व शर्तीनुसार दरपत्रक मागवित आहेत.

| १. | कामाचे नांव | ग्रामीण रुग्णालय मालवण, येथील रुग्णांसाठी आहार सेवा पुरवठा |
|---|---|---|
| १ | ग्रामीण रुग्णालय मालवण येथे आंतररुग्ण रुग्णांकरिता आहार सेवा पुरविणे | ग्रामीण रुग्णालय मालवण आंतररुग्ण रुग्णांकरिता आहार सेवा प्रति दिन रु.१४५/- खालील अटीप्रमाणे पुरवठा करणेबाबत |
| २ | दरपत्रक सादर करणेचे ठिकाण | वैद्यकिय अधिक्षक ग्रामीण रुग्णालय मालवण,ता. मालवण, जि. सिंधुदूर्ग यांचे कार्यालय |
| ३ | दरपत्रक सादर करणेचे अंतिम दिनांक व वेळ | दिनांक १४/०१/२०२६ सायंकाळी ५.३० पर्यंत |
| ४ | दरपत्रक उघडणेचा अंतिम दिनांक व वेळ | दिनांक १५/०१/२०२६ सकाळी ११.३० वाजता दरपत्रक उघडणारे व्यक्ती, संस्था यांनी सदर वेळी स्वतः उपस्थित राहावे. ते उपस्थित न राहील्यास दोन सदस्यीय समितीसमोर दरपत्रक उघडणेत येतील. |
| ५ | दरपत्रकाचे अधिकार | वैद्यकिय अधिक्षक ग्रामीण रुग्णालय मालवण,ता. मालवण, जि. सिंधुदूर्ग |

**अटी व शर्ती :-**

१) ग्रामीण रुग्णालय मालवण येथील आंतररुग्ण रुग्णांना सकाळी ७.०० वाजता कमी साखरेचा चहा देण्यात यावा.

२) रुग्णालयातील आंतररुग्णांना सकाळी ९.०० वाजता नाश्ता देण्यात यावा. त्यामध्ये दूध १५० मिली./ब्रेड ७५ ग्रॅम/पोहे/उपमा/एक प्लेट १०० ग्रॅम देण्यात यावा.

३) रुग्णालयातील आंतररुग्णांना दुपारी जेवण १२.०० वाजता देण्यात यावे त्यामध्ये दोन वाटी भात (८०ग्रॅम), एक वाटी डाळ (५० ग्रॅम) , चपाती -२ (१०० ग्रॅम), भाजी (पालेभाजी,फळभाजी १२५ग्रॅम ), अंडी (रुग्णाच्या प्रकृतीनुसार/मागणीनुसार) देण्यात यावी.

४) रुग्णालयातील आंतररुग्णांना संध्याकाळी ४.०० वाजता चहा देण्यात यावा.

५) रुग्णालयातील आंतररुग्णांना रात्रीचे जेवण ७.०० वाजता देण्यात यावे व अट क्रं. ३ मधील जेवण नमूद असावे.

६) रुग्णालयातील आंतररुग्णांमधील गरोदर माता असतील तर त्यांना संध्याकाळच्या चहाबरोबर शेंगदाणा लाडू, केळी देण्यात यावेत.

७) कोटेशनसोबत आपले आधारकार्ड, फुड लायन्सस, बॅंक पासबुकच्या पहिल्या पानाची झेरॉक्स प्रत अथवा रद्द केलेला बॅंकेचा धनादेश जोडणेत यावा.

८) प्राप्त झालेले निम्न दर हे सन २०२५-२६ या वित्तीय वर्षाकरिता अनुज्ञेय राहतील अथवा जोपर्यत वरिष्ठ स्तरावरुन आहारसेवा पुरविणेबाबतचे आदेश प्राप्त होत नाही तोपर्यतच हे दर लागू राहतील.

९) प्राप्त अन्नपदार्थामध्ये शिळे अन्न अथवा दुषित अन्न आढळल्यास त्वरीत कारवाई करुन संबंधित पुरवठाधारकांची सेवा बंद करण्याचे सर्व अधिकार हे वैद्यकिय अधिक्षक यांना राहतील.

१०) सदरच्या आहार सेवेकरिता महिला बचत गट तसेच स्वयंसेवी संस्था यांना प्राधान्य देण्यात येईल.

११) वरील सर्व अटीची पूर्तता करण्यात यावी.सदरच्या आहार सेवेचे दर आपण नमूद केलेल्या कोटेशन मधील अनुज्ञेय असल्याने आहारसेवा दर रु.१४५/- संपूर्ण दिवसाकरिता अनुज्ञेय राहतील. आपण आपले आहारसेवेचे देयक या कार्यालयाकडे दर महिन्याच्या ५ तारेखस सादर करण्याचे आहे. त्याकरिता लागणारे आपले वैयक्तिक कागदपत्र या कार्यालयास योग्य वेळेत सादर करावे. आपल्या देयकाची अदायगी नियमित २२१००४१३ (१९) आहार सेवा या लेखाशिर्षांतर्गत अंतर्गत कार्यक्रमातून आपल्या बॅंक खात्यात ऑनलाईन ई-कुबेरद्वारे जमा करण्यात येतील.

ग्रामीण रुग्णालय मालवण जि.सिंधुदुर्ग

MEDICAL SUPERINTENDENT CL-1
RURAL HOSPITAL MALVAN
DISTRICT - SINDHUDURG

प्रत :- नोटीस बोर्ड प्रसिध्दी, ग्रामीण रुग्णालय मालवण,जि.सिंधुदुर्ग